NOTARY
MANJUSHA
S. TADAY
REG.NO.15587
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT.
24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

**BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL,**
**WESTERN ZONE BENCH, PUNE**

**ORIGINAL APPLICATION NO. 97 OF 2025 (WZ)**

**Krunnal Gharre** ...**Applicant**

**Versus**

**Pune Municipal Corporation & Ors.** ...**Respondents**

**ADDITTIONAL AFFIDAVIT IN REPLY ON BEHALF OF RESPONDENT NOS. 1 AND 2 – PUNE MUNICIPAL CORPORATION (PMC)**

I, Dr. Ashok D. Ghorpade, Age: Adult, Occupation: Service, presently working as Member Secretary, Tree Authority, Pune Municipal Corporation, having office at Pune Municipal Corporation Building, Shivajinagar, Pune, do hereby state on solemn affirmation as under :

1. I am working in the capacity of Member Secretary in the Pune Municipal Corporation. I am filing this present Additional Affidavit in Reply.

2. I state that I am duly authorized by the Respondents to file the present Additional Affidavit-in-reply in my official capacity. I

disassociate myself from any persona allegations made against me by the applicant in the present application. I have perused documents which has been produced by the Assistant Municipal Commissioner also known as Tree Officers of respective 15 wards and therefore I have understood the contents of the application and am filing the present affidavit based on the records and information available with the Respondent Corporation.

3. I say that I have read and perused the Rejoinder Affidavit filed by the Applicant. Save and except what is specifically admitted herein, all allegations, contentions and averments made therein are denied as false, incorrect, misconceived and contrary to record.

4. In reply to paragraph 3 of the Rejoinder, I state that the information regarding compensatory plantation submitted by the Respondent Corporation has been compiled on the basis of reports received from the concerned permission holders and inspections conducted by the Tree Authority. The data furnished before this Hon'ble Tribunal is accurate and based on official records maintained by the Respondent Corporation.

5. In reply to paragraphs 4 to 6, I submit that under the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Rules, 2009, applicants are required to submit reports regarding compensatory

NOTARY ★ MANJUSHA S. TADAY REG.NO.15587 DISTRICT PUNE MAHARASHTRA EXPIRY DT. 24/11/2029 ★ GOVERNMENT OF INDIA

plantation in Form-G. The prescribed format is made available on the official website of Pune Municipal Corporation.

6. It is submitted that in practice, applicants frequently submit compliance reports accompanied by photographs of plantations. Such reports are verified by site inspections conducted by the Tree Authority. Therefore, the compensatory plantation data submitted by the Respondents is based upon physical verification and official records and cannot be termed as inaccurate.

7. The contention of the Applicant that the number of compensatory trees should be approximately 4,80,000 is incorrect and misleading. Prior to the amendment of 2021, compensatory plantation was governed by Resolution No.14A dated 17.12.2014, under which plantation was generally required in the ratio of 1:3. **Hereto marked and annexed as Annexure R-1A.**

8. I state that after the amendment of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975 in the year 2021, compensatory plantation is required to be undertaken in accordance with the amended statutory provisions, which are based upon the estimated age of the tree proposed to be felled or transplanted. Consequently, the figure of 3,55,126 compensatory trees stated in the Reply Affidavit is correct and is based on the amended legal

NOTARY
MANJUSHA
S. TADAY
REG.NO.15587
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT.
24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

framework. **Hereto marked and annexed as Annexure R-1B is the copy of amendment.**

9. The Applicant has also questioned the figure of 40,507 trees planted. It is submitted that even in cases where Form-G has not been submitted by the applicants, plantation has been physically verified by the Tree Authority and the same has also been recorded through the GIS/GPS Tree Census exercise conducted by the authorized agency.

10. The allegation regarding plantation being shown in Africa or outside India is wholly misconceived. The discrepancy pointed out by the Applicant arose due to typographical interchange of latitude and longitude coordinates at only a few locations. The plantation locations are clearly identified by detailed site addresses. The error was purely clerical and does not affect the existence of plantations on the ground.

11. The Applicant has sought to create an unwarranted controversy on the basis of isolated typographical mistakes despite the fact that the plantation sites are identifiable through complete location descriptions and verification records.

12. In reply to paragraph 15, it is submitted that the tree census undertaken by Pune Municipal Corporation during the period 2016–

NOTARY
MANJUSHA S. TADAY
REG.NO.15587
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT. 24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

2024 recorded 57,81,578 trees within the earlier municipal limits. The exercise was completed on 28.03.2024. The tree census information is available through the dedicated Tree Census portal maintained by Pune Municipal Corporation. The compensatory plantation data submitted before this Hon'ble Tribunal has also been verified through GIS/GPS based records and the agency engaged for tree census work.

13. The Applicant's contention that the Respondent Corporation is deliberately avoiding forfeiture of security deposits is denied.

14. Under the provisions of the Act and Resolution No.14A dated 17.12.2014, a security deposit of Rs.10,000/- per tree is accepted for ensuring plantation, preservation and maintenance of compensatory trees. The said security deposit is not the statutory valuation of the tree proposed to be felled. It is merely a security mechanism intended to ensure compliance with plantation obligations.

15. Section 8(5A) of the Act requires the applicant and the Tree Authority to ensure compensatory plantation and survival of trees for a minimum period of seven years. The provison relating to deposit of an amount equivalent to tree valuation cannot presently be implemented because the State Government has not yet notified the methodology for valuation of trees as contemplated under the

NOTARY
MANJUSHA S. TADAY
REG.NO.15687
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT. 24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

Act. For this reason, Pune Municipal Corporation has already addressed correspondence to the State Government seeking guidance regarding valuation and implementation of the amended provisions. The Applicant's contention that the Tree Authority itself is obligated to undertake plantation from security deposit amounts has no basis in the Act. The statutory responsibility of plantation primarily rests upon the permission holder. **Hereto marked and annexed as Annexure R-1C is the copy of correspondence with the state government.**

16. The allegations regarding conflict of interest on the part of the Municipal Commissioner are denied.

17. The Municipal Commissioner functions as Chairperson of the Tree Authority by virtue of statutory provisions. Both offices are created under law and their exercise cannot be termed illegal merely because they are held by the same authority. The decisions of the Tree Authority are not unilateral decisions of the Municipal Commissioner but are taken through the statutory mechanism involving the Tree Authority Committee and Expert Committee.

18. The Applicant's calculation regarding alleged shortfall of security deposits is incorrect. The fact that Rs.18.16 crore has been collected

NOTARY GOVERNMENT OF INDIA MANJUSHA S. TADAY REG.NO.15587 DISTRICT PUNE MAHARASHTRA EXPIRY DT. 24/11/2028

does not imply that the balance amount pertains exclusively to Pune Municipal Corporation projects.

19. Permissions granted during the relevant period include proposals relating to dangerous trees, public utility works and various Government projects. Collection of security deposits depends upon the nature of the proposal and the prevailing administrative practice and cannot be mechanically equated with the total number of trees involved.

20. The Applicant has incorrectly described the procedure followed by Pune Municipal Corporation for processing tree felling and transplantation proposals.

21. The existing procedure is in conformity with the directions issued by the Hon'ble Bombay High Court in PIL No.93 of 2009 and the provisions of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975. A provisional NOC is issued on the basis of a proposed development layout showing existing trees and likely tree impacts. The same enables scrutiny of the development proposal from the tree preservation perspective. Thereafter, a separate proposal for tree felling/transplantation is submitted along with sanctioned plans, commencement certificate, Form-C, photographs, undertaking and other requisite documents. Site

NOTARY
MANJUSHA S. TADAY
REG.NO.15587
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT. 24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

inspections are conducted by the Expert Committee and Tree Officer, objections are invited through public notice, hearings are conducted and only thereafter is the proposal placed before the competent authority for approval. Security deposit is collected before grant of final permission. Therefore, the procedure followed by the Respondent Corporation is lawful, transparent and consistent with the applicable statutory framework.

22. The allegation that Pune Municipal Corporation has falsely claimed non-availability of land for plantation is denied.

23. It is submitted that after inclusion of additional villages pursuant to Government Notification dated 30.06.2021, the municipal area has increased from approximately 243.88 sq. km. to approximately 519 sq. km. Identification of suitable land for plantation requires verification of ownership, possession, reservation status and long-term availability of such land. Mere availability of open land in satellite imagery does not establish that such land is available for plantation purposes.

24. Large portions of land within the municipal limits belong to the Forest Department, Defense Authorities and various Government Departments. Pune Municipal Corporation has been making efforts

NOTARY MANJUSHA S. TADAY REG NO.15587 DISTRICT PUNE MAHARASHTRA EXPIRY DT. 24/11/2029 GOVERNMENT OF INDIA

to secure suitable land for plantation and has corresponded with concerned authorities in this regard.

25. Pune Municipal Corporation has undertaken various plantation initiatives including Miyawaki plantations, monsoon plantation drives, Amrit Van projects and distribution of saplings to citizens. The Respondent Corporation remains committed to increasing green cover and ensuring compliance with the objectives of the Tree Act.

26. In view of the above, the allegations made in the Rejoinder Affidavit are devoid of merit and deserve to be rejected.

27. I say and submit that this Hon'ble Tribunal be pleased to dismiss the contentions raised in the Rejoinder Affidavit and pass such further orders as may be deemed fit and proper in the facts and circumstances of the case.

NOTARY
MANJUSHA S. TADAY
REG.NO.15587
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT. 24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

Respondent No. 1 & 2
Dr. Ashok D. Ghorpade
Joint Municipal Commissioner
&
Member Secretary, Tree Authority
Pune Municipal Corporation

Pune
Date: 22/06/2026

NOTARY
MANJUSHA S. TADAY
REG.NO.15587
DISTRICT PUNE
MAHARASHTRA
EXPIRY DT. 24/11/2029
GOVERNMENT OF INDIA

**VERIFICATION**

I, Dr. Ashok D Ghorpade, Age: Adult, Member Secretary, tree Authority Department, Pune Municipal Corporation authorized signatory for the Pune Municipal Corporation do hereby state on solemn affirmation that what is stated forgoing Para's is true and correct to my knowledge and belief.

Solemn affirmation at Pune

This 27 day of June 2026.

27/06/2026

**Adv. For Respondent No. 1 & 2**

**Respondent No. 1 & 2**
**Dr. Ashok D. Ghorpade**
Joint Municipal Commissioner
&
Member Secretary, Tree Authority
Pune Municipal Corporation

**BEFORE ME**

**MANJUSHA S.TADAY**
ADVOCATE & NOTARY
GOVERNMENT OF INDIA
Noted And Registered
At Serial Number 1157/2026

# पुणे महानगरपालिका

## वृक्ष प्राधिकरण

### समिती ठराव

सभा क्र.४ दिनांक :- १७/१२/२०१४

विषय क्रमांकः-१४ (अ) ठराव क्रमांक :- १४ (अ) खाते: मा.अति.महा.आयुक्त (ई)

---

विषय – नविन वृक्ष संवर्धनापोटी ठेव रक्कम स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- मा.उद्यान अधिक्षक (वृक्ष),पुणे मनपा यांचे जा.क्र.सस/वृक्ष प्राधिकरण/१४ अ, दिनांक १०/१२/२०१४ यांचे विषयपत्र.

१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनीच्या विकासासाठी अडथळा करणारे वृक्ष काढणे, पुनर्रोपण करणे या प्रित्यर्थ रक्कम रुपये १०,०००/- ठेव स्विकारणेस त्याबद्दल्यात १:३ स्थानिक उपलब्ध वृक्षांच्या जाती त्याच जागी किंवा आदेशात विनिर्दिष्ठ करण्यात येईल, अशा इतर योग्य जागी लावणे, संरक्षण व जतन करणेच्या अटीवर ठेव रक्कम स्विकारून महाराष्ट्र (नागरी क्षेत्र)झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र)वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम,२००९ व मे. उच्च न्यायालय,मुंबई यांचे जनहित याचिका क्र. ९३/२००९, दि. २० सप्टेंबर २०१३ रोजी देण्यात आलेल्या आदेशास अधिन राहून परवानगी देणेस,

२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत महानगरपालिकेच्या विविध विकासास, रस्ता रुंदीकरण इत्यादी कामास अडथळा करणारे वृक्ष काढणे, पुनर्रोपण करणे या कामासाठी त्या विभागामार्फत वृक्ष काढणे, पुनर्रोपण करणे व नविन स्थानिक उपलब्ध वृक्षांच्या जातींची लागवड करणे, संरक्षण व जतन करणेच्या अटीवर संबंधित खात्याकडून हमीपत्र घेवून परवानगी देणेस,

३) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वादळवारा,आग,वीज किंवा मुसळधार पावसाने वृक्ष पडले असतील/नष्ट झाले असतील किंवा झाड मेलेले असेल किंवा वृक्ष रोगग्रस्त,नैसर्गिकरित्या भिंतीमध्ये वाढले असेल तर त्यापासून जीवितास वा मालमत्तेस धोका असल्यास किंवा त्यामुळे वाहतुकीस अडथळा होत असल्यास अशा जमिनीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला अशा पडलेल्या किंवा नष्ट झालेल्या वृक्षांऐवजी समुचित प्रमाणात जागेवर वृक्ष नसल्यास, स्थानिक जातीचे किंवा इतर स्थानिक जातीचे एक किंवा अधिक वृक्ष लावण्याच्या अटीवर ठेव रकमेची अट शिथिल करून त्याच जागी किंवा इतर योग्य जागी वृक्ष लावणेच्या अटीवर मा.वृक्ष अधिकारी यांनी परवानगी देणेस,

४) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत ज्याला वृक्ष लावण्याचा निर्देश देण्यात आला असा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार त्या वृक्षांची योग्य वाढ होत आहे आणि त्यांचे चांगले जतन होत आहे, हे पाहण्यास जबाबदार राहील व तो अशा वृक्षांच्या किंवा वृक्षांच्या स्थितीविषयीचा,तीन वर्षाच्या कालावधीसाठीचा अहवाल,सहा महिन्यांतून एकदा वृक्ष अधिकाऱ्याला देणेस,

५) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वृक्ष अधिकाऱ्याच्या मान्यतेने जमिनीच्या विकासासाठी परवानगी देणेस (पूर्व ना हरकत पत्र) तसेच कोणत्याही इमारतीस कोणतेही समाप्तीचे किंवा भोगवट्याचे प्रमाणपत्र देताना महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम,२००९ मधील अनुसुची १ कलम ७ (एच) मध्ये रस्त्यांच्या बाजुने व विविध वापराखालील लागवड करावयाच्या वृक्षांच्या संख्याबाबतची प्रमाणके (उदा. १ वृक्ष/भूखंडाच्या १०० चौ.मी.क्षेत्रासाठी) याप्रमाणे वृक्षांची लागवड केली असल्यास परंतू वृक्ष १० से.मी. पेक्षा कमी घेर व ३ मी. पेक्षा कमी उंची व वृक्षाचे वय ५ वर्षापेक्षा कमी असल्यास/ नव्याने वृक्ष लागवड केलेली असल्यास वृक्ष संरक्षण व जतन करण्याची जबाबदारी आणि आदेशाचे योग्यरित्या पालन व्हावे, म्हणून प्रति वृक्ष रक्कम रू.१०,०००/- (दहा हजार रूपये) ठेव स्विकारणेस,

६) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत वृक्षारोपणाच्या आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास ठेव रक्कम जमा करणेस,

७) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे संदर्भ क्र. ६ च्या कार्यालयीन परिपत्रकाप्रमाणे संबंधित खात्यांनी कार्यवाही करणेस,

मान्य

सुचक:- सौ कमलताई व्यवहारे

अनुमोदक:- दि. स. पोळेकर

अध्यक्ष  
वृक्ष प्राधिकरण  
पुणे महानगरपालिका

सदस्य सचिव तथा वृक्ष अधिकारी  
वृक्ष प्राधिकरण  
पुणे महानगरपालिका

PUNE MUNICIPAL CORPORATION

TREE AUTHORITY

COMMITTEE RESOLUTION

MEETING NO.04 DATE 17/12/2014

SUBJECT NO - 14A RESOLUTION NO. 14 (A)

DEPARTMENT - ADD.MUNICIPAL COMMISSIONER (ESTATE)

---

Subject: Approval for accepting deposit amounts for new tree conservation.

Reference: Letter from the Hon. Garden Superintendent (Trees), Pune Municipal Corporation, Reference No. Sas/Tree Authority/14 A, dated 10/12/2014.

1) For the removal or transplantation of trees obstructing land development within the Pune Municipal Corporation limits, a security deposit of ₹10,000/- will be accepted. Permission is granted on the condition that three local tree species must be planted for every one tree removed (1:3 ratio). These must be planted at the same site or a location specified in the order. This is subject to the provisions of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975, the 2009 Rules, and the High Court, Mumbai order dated September 20, 2013 (PIL No. 93/2009).

2) For removing or transplanting trees that obstruct various municipal development projects (such as road widening), the concerned department must handle the removal and transplantation. Permission is granted upon receiving a guarantee letter from the relevant department promising to plant, protect, and maintain new local tree species.

3) In cases where trees within PMC limits have fallen or been destroyed due to storms, fire, lightning, or heavy rain, or if a tree is dead, diseased, or growing naturally in a wall and poses a danger to life, property, or obstructs traffic:The landowner or occupier is required to plant an appropriate number of trees in place of the destroyed ones. If there is no space available on-site, the Tree Officer may waive the deposit requirement and grant permission on the condition that one or more local tree species be planted at the same location or another suitable site.

4) The landowner or occupant who has been directed to plant trees within the Pune Municipal Corporation limits shall be responsible for ensuring their proper growth and maintenance. Furthermore, they are required to submit a status report of such tree(s) to the Tree Officer once every six months for a period of three years.

5) When granting permission for land development (NOC) or issuing a Completion/Occupancy Certificate for any building, the Tree Officer shall ensure compliance with the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Rules, 2009 (Schedule 1, Clause 7-H).This includes standards for planting trees along roadsides and in various plots (e.g., 1 tree per 100 sq. meters of plot area). If the planted trees have a girth of less than 10 cm, a height of less than 3 meters, or are less than 5 years old, a security deposit of ₹10,000 (Ten Thousand Rupees) per tree shall be accepted to ensure the responsibility of conservation and proper following of orders.

6) In the event of a failure to comply with the tree plantation orders within the Pune Municipal Corporation limits, the deposited security amount shall be forfeited/deposited (to the corporation).

7) The concerned departments shall take necessary action as per the official circular (Ref. No. 6) issued by the Hon. Municipal Commissioner, Pune Municipal Corporation.

"Approved"

(Proposer)
--SD--
(Mrs. Kamaltai Vyavhare sign)
(Tree Authority Committee Member)

--SD--
(Chairman)
Tree Authority
Pune Municipal Corporation

--SD--
(Seconder)
(Mr.D.S.Polekar sign)
(Tree Authority Committee Member)

-- SD ---
Member Secretory
In charge Tree officer
Tree Authority Committee
Pune Municipal Corporation

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : वृक्ष अ २०२१/ प्र.क्र.१९/ तां.क.४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२१

<u>वाचा:</u> महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी प्रसिध्द महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२१ (सन २०२१ चा अधिनियम क्रमांक ९)

<u>परिपत्रक :</u>

राज्यातील नागरी भागातील झाडांचे संरक्षण व जतन करण्यासाठी "महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५" (यापुढे "**मुख्य अधिनियम**" असे संबोधण्यात आले आहे.) हा अधिनियम अस्तित्वात आहे. या मुख्य अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता, "महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२१" (सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९) (यापुढे "**सुधारित अधिनियम**" असे संबोधण्यात आले आहे.) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार मध्ये दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. सदर महाराष्ट्र शासन राजपत्राची मराठी व इंग्रजी प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

२. "महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५" मध्ये दिनांक १६ जुलै, २०२१ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रान्वये करण्यात आलेल्या ठळक तरतूदी व संबंधित कलमे पुढील प्रमाणे आहेत: -

(१) **"पुरातन (हेरिटेज) वृक्ष:**

**मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये विविध संज्ञांची व्याख्या देण्यात आली आहे. सुधारित अधिनियमान्वये त्यामध्ये खंड (१-क) नव्याने समाविष्ट करून पुरातन (हेरिटेज) वृक्ष ही संज्ञा समाविष्ट करून, त्याची परिभाषा शासनाव्दारे अधिसूचित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

*त्यानुसार, "पुरातन (हेरिटेज) वृक्ष, हा कोणत्याही प्रजातीचा असा वृक्ष असेल, ज्यांचे अंदाजित वय ५० वर्षे किंवा त्याहून अधिक असेल." अशी पुरातन (हेरिटेज) वृक्षाची परिभाषा निश्चित करणारी अधिसूचना शासन स्तरावरून निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.*

(२) **वृक्षांचे वय:**

**मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये नव्याने समाविष्ट खंड (१-क), मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील, पोट कलम (३) मध्ये, सुधारित अधिनियमान्वये नव्याने समाविष्ट केलेल्या**

**खंड (क) (दोन) (सहा) व पोट कलम (५) मध्ये, सुधारित अधिनियमान्वये नव्याने समाविष्ट केलेल्या खंड (ब) नुसार शासना मार्फत वृक्षांचे वय निर्धारित करण्याचे निकष व पध्दती ठरवून देण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

*त्यानुसार, वृक्षांना पुरातन (हेरिटेज) दर्जा देण्यासाठी, भरपाई वृक्षारोपणांतर्गत लागवड करावयाच्या वृक्षांची संख्या निश्चित करण्यासाठी व पाडावयाच्या वृक्षाचे वय निर्धारित करण्यासाठी निकष व पध्दती निश्चित करणारी अधिसूचना शासन स्तरावरून निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.*

(३) **भरपाई वृक्षारोपण:**

**मुख्य अधिनियामाच्या कलम ८ मध्ये,**

(i) **सुधारित अधिनियमान्वये पोट कलम (५) ला खंड (अ) असा नवीन क्रमांक देऊन त्यामध्ये सदर दुरूस्ती करण्यात आली आहे.**

- पाडण्यात येणाऱ्या वृक्षांच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या वृक्षांच्या संख्ये इतकी वृक्ष लावावीत.
- लागवड करताना किमान ६ फूट उंचीची रोपे लावण्यात यावीत.

(ii) **सुधारित अधिनियमान्वये पोट कलम (५अ) व त्याचे परंतुकांन्वये सदर दुरूस्ती करण्यात आली आहे.**

- अशा प्रकारे लावण्यात येणारे वृक्षांचे सात वर्षा पर्यत संगोपन करणे आवश्यक राहील.
- या कालावधी मध्ये वृक्ष न जगल्यास, तितक्याच संख्येची वृक्ष लागवड करून त्याची हानीपूर्ती करावी लागेल.
- नुकसान भरपाई म्हणून वृक्ष लागवड करणे शक्य नसेल तर, तोडल्या जाणाऱ्या वृक्षांच्या मूल्यांकनापेक्षा कमी नसेल एवढी रक्कम अर्जदार जमा करू शकतात. असे मुल्यांकन शासनाव्दारे अधिसूचित करण्यात येईल अशा पध्दतीवर आधारित असेल.

*वृक्षांचे मुल्यांकन ठरविण्याची कार्यपध्दती ठरवून त्याबाबतची अधिसूचना शासन स्तरावरून निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.*

(४) **मोठया प्रमाणातील वृक्ष तोड:**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये पोट कलम (३) खंड (अ-१) नंतर परंतुक दाखल करून सदर दुरूस्ती करण्यात आली आहे.**

- पाच वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची २०० हून अधिक वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे पाठविला जाईल.
- स्थानिक वृक्ष प्राधिकरणाने याची खात्री करुन घ्यावी की, वृक्षांची संख्या निश्चित केलेल्या मर्यादेत ठेवण्यासाठी प्रकल्पांचे लहान लहान भागात विभाजन केले जाणार नाही.

**मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये पोट कलम (५ ब) (ड) अन्वये सदर दुरूस्ती करण्यात आली आहे.**

- महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाने झाडे तोडण्याची शिफारस जारी केली तरी, स्थानिक वृक्ष प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणास त्यांच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची विनंती करू शकतील.

(५) **महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण:**

**(अ) स्थापना :**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये नवीन पोट कलम (अ-१) समाविष्ट करून राज्यस्तरावर शासनाच्या सचिव पदापेक्षा कमी दर्जाचे नसतील अशा अधिकाऱ्यांचा समावेश असणारे महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

*त्यानुसार, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटित करणारी अधिसूचना शासन स्तरावरून निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.*

**(ब) कर्तव्ये:**

**मुख्य अधिनियमाच्या प्रकरण चार मधील कलम ७ च्या अगोदर, सुधारित अधिनियमान्वये खालील नवीन कलम ६अ समाविष्ट करून महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये विहित करण्यात आली आहेत:**

*(एक) वृक्ष प्रधीकारणाच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे;*

*(दोन) संपूर्ण राज्यातील पुरातन (हेरीटेज) वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करणे;*

*(तीन) पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्याच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जावर निर्णय घेणे;*

*(चार) पुरातन (हेरीटेज) वृक्ष तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे;*

*(पाच) झाडाचे संरक्षण व संवर्धन करण्याशी संबंधित असणारी इतर कोणतीही कामे करणे."*

(६) **स्थानिक वृक्ष प्राधिकरण :**

**(अ) रचना:**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील सुधारित अधिनियमान्वये दाखल केलेल्या पोट कलम (२) व पोट कलम (३) अन्वये सदर तरतूद करण्यात आली आहे.**

- वृक्ष तज्ञ हे स्थानिक वृक्ष प्राधिकरणाचा भाग असतील.
- वृक्ष प्राधिकरणाने घेतलेले निर्णय वृक्ष तज्ञांच्या सल्ल्यावर आधारित राहील.
- नगर परिषदेच्या बाबतीत वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष "**मुख्याधिकारी**" राहतील.

**(ब) कर्तव्ये :**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये दाखल केलेल्या खंड (ब), खंड (ज), खंड(के), खंड(ल), खंड (म), खंड (न) व खंड (ओ) दाखल करून सदर तरतूद करण्यात आली आहे.**

- दर पाच वर्षांनी वृक्षांची गणना केली जाते याची खात्री करतील.
- हेरिटेज वृक्ष म्हणून वर्गीकरण करणे, गणना करणे आणि संवर्धन करणे.
- स्थानिक प्रजातीच्या झाडांची लागवड आणि त्यांचे जतन करणे.
- नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील सर्व भूमीवरील वृक्षांचे अस्तित्व सुनिश्चित करणे.
- शहरी स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा सरकारी मालकीच्या जमिनीवर वृक्षारोपण केले जाईल हे सुनिश्चित करणे. हे वृक्षारोपण वैज्ञानिक पद्धतीने, स्थानिक प्रजातींच्या संरक्षणाच्या दृष्टीने व वृक्षारोपणांतर्गत क्षेत्र हे किमान ३३% असेल या उद्देशाने केले जाईल.

- वृक्षांची देखभाल व छाटणी (pruning) शास्त्रोक्त पद्धतीने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनावर केली जाते हे सूनिश्चित करणे.
- नुकसान भरपाईसाठीची लागवड व त्याचे संगोपन सुनिश्चित करणे.
- वृक्ष उपकराचा उपयोग वृक्षांच्या संवर्धनासाठी सुनिश्चित करणे.
- महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाने वेळोवेळी नियुक्त केलेल्या इतर कामे / जबाबदाऱ्या पार पाडणे.

(७) **वृक्ष गणना:**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये सुधारित केलेल्या खंड(ब) अन्वये सदर तरतूद करण्यात आली आहे.**

- दर पाच वर्षांनी किमान एकदा वृक्ष गणना करावी.
- नवीन तंत्रज्ञानाचा (GIS ) वापरासाठी प्रोत्साहन देणे.

(८) **लागवडीसाठी सामुहिक जमीन :**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये सदर तरतूद करण्यात आली आहे.**

- स्थानिक वृक्ष प्राधिकरण वृक्षारोपण करण्याच्या उद्देशाने जमीन सुनिश्चित करणे.
- वृक्षारोपण शास्त्रीय पध्दतीने केले जावे.
- हरित क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी स्थानिक प्रजातींच्या वृक्षांच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यात यावे.
- जागा उपलब्ध नसल्यास भरपाई वृक्षारोपण हे सार्वजनिक जमिनीवर केले जाऊ शकते
- **खालील काही वृक्षारोपण पद्धती अवलंबल्या जाऊ शकतात:**

  १) मियावाकी वृक्षारोपण

  २) अमृत वन

  ३) स्मृती वन

  ४) शहरी वने

(९) **वृक्षांचे पुनर्रोपण :**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये दाखल केलेल्या नवीन खंड (आय) दाखल करून सदर तरतूद करण्यात आली आहे.**

- पुनर्रोपण केवळ तज्ञांच्या मार्गदर्शनावर केले जावे.
- पुनर्रोपण करण्यात येणाऱ्या वृक्षाच्या अंदाजे वया इतके वृक्षारोपण भरपाई म्हणून करावे.

(१०) **वृक्ष संरक्षणासाठी पर्यायी प्रकल्प:**

**मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील, पोट कलम (२) मध्ये, दाखल केलेल्या परंतुकान्वये सदर तरतूद करण्यात आली आहे.**

- प्रकल्पाचे आरेखन करताना कमीत कमी झाडे तोडण्यात यावीत या अनुषंगाने पर्यायी विकल्पांचा विचार केला जावा.

(११) **वृक्ष उपकर :**

**मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये पोट कलम (३) व पोट कलम (४) दाखल करून पुढील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.**

- शासन वेळोवेळी निर्देश देईल अशा रितीने वृक्ष उपकराचा विनियोग स्थानिक प्राधिकरणाव्दारे करण्यात येईल.
- विद्यमान हरित आच्छादन क्षेत्रे विचारात घेऊन, झाडांचे जतन व संवर्धन करण्यासाठी, उपकराच्या विनियोगासाठी शासन स्थानिक प्राधिकरणास निर्देश देईल.

*त्यानुसार, वृक्ष उपकराच्या विनियोगासाठी विविध निकष निर्धारित करण्याची बाब शासन स्तरावर सुरू आहे.*

(१२) **दंडाच्या तरतुदी :**

**मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये, सुधारित अधिनियमान्वये पोट कलम (१) मध्ये सुधारणा करून पुढील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.**

- दंडाची रक्कम हि वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे आकारली जाईल.
- सदर रक्कम प्रति वृक्षास जास्तीत जास्त रू. १ लाख पर्यंत मर्यादित राहील.

*त्यानुसार, झाडांचे मुल्य ठरविण्याची पध्दती अधिसूचित करण्याची बाब शासन स्तरावर सुरू आहे.*

३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सर्व सुधारणांचा विचार करून अधिनियमातील तरतूदींची सर्व संबंधित नागरी स्थानिक संस्थांमध्ये तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा सांकेतांक २०२१०८०६१८०८०६६९०४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manisha Patankar Mhaiskar

Digitally signed by Manisha Patankar Mhaiskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment And Climate Change Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef2886076676dbebee07d0f1af7414b764ea7e53eca a48a423e4054ca267ca6, cn=Manisha Patankar Mhaiskar
Date: 2021.08.06 18:18:25 +05'30'

**( मनीषा पाटणकर-म्हैसकर )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१) मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) विभागीय आयुक्त (सर्व)
४) जिल्हाधिकारी (सर्व)
५) आयुक्त, महानगरपालिका (सर्व
६) प्रादेशिक उप संचालक, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
७) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
८) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती (सर्व)
९) निवडनस्ती, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ७, अंक ८] शुक्रवार, जुलै १६, २०२१/आषाढ २५, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक १०

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.—** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. | १-६ |

दिनांक १५ जुलै २०२१ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतीश वाघोले,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“महाराष्ट्र शासन राजपत्रात”** दिनांक १६ जुलै २०२१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९७५ चा महा. ४४. **ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मधील,— १९७५ चा महा. ४४.

(१) खंड (१-क) ला खंड (१-कक) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ;

(२) असा नवीन क्रमांक दिलेल्या खंड (१-कक) च्या अगोदर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(१-क) "पुरातन (हेरीटेज) वृक्ष" याचा अर्थ, शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येतील अशा मानकांनुसार, वृक्ष प्राधिकरणाद्वारे तसे वर्गीकृत केलेले झाड, असा आहे ;".

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील,—

(१) पोट-कलम (१) च्या अगोदर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(अ-१) महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभानंतर, होईल तितक्या लवकर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासनाच्या सचिव पदापेक्षा कमी दर्जाचे नसतील अशा अधिकाऱ्यांचा समावेश असणारे, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटित करील.”; सन २०२१ चा महा. ९.

(२) पोट-कलम (२) मधील, तक्त्यामधील, नोंद २ मधील, स्तंभ (२) मधील "नगरपालिकेचा अध्यक्ष" या शब्दांऐवजी "नगरपालिकेचा मुख्य अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मधील, "ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रातले विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा, बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना" या मजकुराऐवजी "शासनाद्वारे, वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशा किमान कालावधीचा, झाडांची लागवड (रोपण), जतन व संवर्धन यांमधील अनुभव असलेल्या बिनसरकारी संघटनांसह सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांपैकी तज्ञ व्यक्तींना” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ यामध्ये नवीन कलम ६अ समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण चार मधील, कलम ७ च्या अगोदर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये.

"**६अ.** संबद्ध अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आणि राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण निदेशांस अधीन राहून, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल :—

(एक) वृक्ष प्राधिकरणाच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे ;

(दोन) संपूर्ण राज्यातील पुरातन (हेरीटेज) वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करणे ;

(तीन) पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्याच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे ;

(चार) पुरातन (हेरीटेज) वृक्ष तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे ;

(पाच) झाडाचे संरक्षण व संवर्धन करण्याशी संबंधित असणारी इतर कोणतीही कामे करणे. ".

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील,—

(१) खंड (ब) मध्ये, "पाच वर्षांतून एकदा" या मजकुरानंतर, "भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आधारित झाडांची गणना किंवा अन्य कोणतेही आधुनिक तंत्रज्ञान यांसारख्या नवीन तंत्रज्ञान साधनांचा वापर करून" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (आय) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(आय) प्रतिरोपण करण्यात येणाऱ्या झाडाच्या वयाच्या संख्येएवढी, त्याच जातीच्या किंवा इतर कोणत्याही स्थानिक किंवा मूळ जातीच्या झाडांची लागवड करणे आणि असे प्रतिरोपण केवळ तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच करणे ;

(ज) नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील सर्व जमिनींमध्ये भरपाई वृक्ष लागवड केली जात असल्याची आणि भरपाई वृक्ष लागवडीसह सर्व झाडे जगतील याची सुनिश्चिती करणे ;

(के) झाडांचे संवर्धन व जतन करण्यासाठी वृक्ष उपकराचा विनियोग करण्याची सुनिश्चिती करणे ;

(ल) महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाने, वेळोवेळी नेमून दिलेले इतर कोणतेही उपक्रम पार पाडणे ;

(म) पुरातन (हेरीटेज) वृक्ष म्हणून कोणते झाड वर्गीकृत करावयाचे आहे याचा निर्णय घेणे आणि पुरातन (हेरीटेज) वृक्षांची प्रगणना करणे ;

(न) नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीची जमीन किंवा शासनाच्या मालकीची जमीन वृक्षारोपणाच्या प्रयोजनासाठी राखून ठेवली आहे याची सुनिश्चिती करणे, आणि असे वृक्षारोपण, शास्त्रीयदृष्ट्या करण्यात येईल आणि स्थानिक प्रजातींचे जतन करण्याच्या आणि ३३ टक्केपेक्षा कमी नसेल इतक्या मर्यादेपर्यंत हरित आच्छादित क्षेत्रामध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने करण्यात येईल याची सुनिश्चिती करणे ;

(ओ) प्रत्येक वर्षी, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रीय पद्धतीने झाडांची छाटणी करण्याची व त्यांची देखभाल करण्याची सुनिश्चिती करणे ;

(प) नैसर्गिकरीत्या पडलेल्या प्रत्येक झाडासाठी, नागरी स्थानिक प्राधिकरणाकडून भरपाई वृक्ष लागवड केली जात असल्याची सुनिश्चिती करणे ;

(क्यू) या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर कोणत्याही योजना किंवा उपाययोजना हाती घेणे.".

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील,—

(१) पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जेव्हा मोठ्या प्रमाणात झाडे पाडण्याचे प्रस्तावित केले असेल त्याबाबतीत, संबंधित संकल्पचित्रासाठी, पाडणे आवश्यक असलेल्या झाडांच्या संख्येसह पर्यायी संकल्पचित्र, अर्जासोबत सादर करण्यात येईल.".

(२) पोट-कलम (३), मध्ये,—

(अ) खंड (क) मधील,—

(एक) उप-खंड (तीन) मधील "आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येतील :—

"(पाच) जर पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडावयाचा असेल तर, जाहिरातीमध्ये विनिर्दिष्टरीत्या तसे नमूद करावे ; आणि

(सहा) शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा निकषानुसार व पद्धतीनुसार पाडावयाच्या झाडाचे वय निर्धारीत करणे." ;

(ब) खंड (अ-१) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु, जेव्हा पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशे पेक्षा अधिक झाडे पाडण्याचे प्रस्तावित असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा पाडण्याचे प्रस्तावित केलेले झाड हे, पुरातन (हेरीटेज) वृक्ष असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु तसेच, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पाडावयाच्या झाडांची संख्या दोनशे पेक्षा कमी ठेवता यावी म्हणून भूविकास किंवा अन्य कोणताही प्रकल्प, लहान-लहान भागांमध्ये उप-विभाजित केला जाणार नाही याची खात्री करील." ;

(३) पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या पोट-कलमाच्या तरतुदी पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडण्याच्या बाबतीत लागू असणार नाहीत." ;

(४) पोट-कलम (५) मधील,—

(अ) पोट-कलम (५) ला खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ;

(ब) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या खंड (अ) मध्ये "अर्जदार, पाडावयाच्या झाडांच्या दुप्पट झाडे लावील," या मजकुराऐवजी "अर्जदार, पाडण्यात येणाऱ्या झाडांच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडांच्या संख्येइतकी झाडे लावील आणि लावण्यात यावयाची अशी झाडे ही, किमान सहा फूट इतक्या उंचीची असतील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या खंड (अ) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ब) वृक्ष अधिकारी, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा निकषानुसार व पद्धतीनुसार पाडल्या जाणाऱ्या झाडाचे वय निर्धारित करील." ;

(५) पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

" (५अ) अर्जदार व वृक्ष प्राधिकरण किंवा वृक्ष अधिकारी असे सुनिश्चित करतील की, भरपाई वृक्ष लागवड करण्यात येईल आणि लावलेली झाडे कमीत कमी सात वर्षांच्या कालावधीसाठी जगतील. या कालावधीमध्ये झाडे न जगल्यास, तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपूर्ती (भरपाई) करण्यात येईल, याची देखील ते सुनिश्चिती करतील :

परंतु, जर भरपाई वृक्ष लागवड करणे अर्जदाराला शक्य नसेल तर, अर्जदार, पाडलेल्या झाडांच्या मूल्यांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम जमा करील. असे मूल्यांकन शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पद्धतीवर आधारित असेल :

परंतु आणखी असे की, जमा केलेल्या रकमेचा विनियोग केवळ, भरपाई वृक्ष लागवडीसाठी, त्याच्या जतन करण्याच्या आणि या कालावधीत न जगलेल्या झाडांच्याऐवजी भरपाई वृक्ष लागवड करण्याच्या प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

(५ब) (अ) वृक्ष प्राधिकरण, पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे पाडण्यासाठी प्राप्त झालेला अर्ज, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील.

(ब) वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडण्याचा अर्ज महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील.

(क) महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, वृक्ष प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, वृक्ष अधिकाऱ्याने खंड (अ) व (ब) अन्वये त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेला अर्ज, वृक्ष प्राधिकरणाकडून किंवा वृक्ष अधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत, शर्तीसह किंवा शर्तीशिवाय, एकतर मान्य करील अथवा तो नाकारू शकेल.

(ड) जेव्हा महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, झाडे पाडण्याला परवानगी देईल तेव्हा, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असल्याचे वाटत असेल तर, वृक्ष प्राधिकरण, निर्णय कळविल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी त्याच्या कारणांसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाला विनंती करू शकेल. त्यानंतर, अशा विनंतीवर, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडून दहा दिवसांच्या आत निर्णय घेण्यात येईल.

(५क) पोट-कलम (५) अन्वये झाडे पाडण्यास परवानगी दिलेल्या झाडांच्या ऐवजी लागवड केलेल्या नवीन झाडांचे, उपलब्ध असलेल्या नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून भौगोलिक स्थानचित्रांकन (जिओ-टगिंग) व संनियंत्रण करण्यात येईल.”.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

“(३) या कलमाच्या तरतुदींअन्वये जमा केलेल्या वृक्ष उपकराचा विनियोग, शासन वेळोवेळी निदेश देईल अशा रीतीने, स्थानिक प्राधिकरणाद्वारे करण्यात येईल.

(४) राज्य शासनास, विद्यमान हरितआच्छादन क्षेत्रे विचारात घेऊन आणि झाडांचे जतन व संवर्धन करण्यासाठी क्षेत्राच्या गरजेचे निर्धारण करून, विविध नागरी स्थानिक प्राधिकरणांसाठी, उपकराच्या विनियोगासाठी निदेश देता येतील व विविध निकष, निर्धारित करता येतील.”.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २१ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम २१ च्या पोट-कलम (१) मध्ये, " एक हजार रुपयांपेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या " या मजकुराऐवजी, " शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पद्धतीचा वापर करून, काढलेल्या झाडाच्या मूल्याइतके परंतु, एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

Translated copy

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग आठ

वर्ष ७, अंक १३] शुक्रवार, जुलै १६, २०२१/आषाढ २५, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक २८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees (Amendment) Act, 2021 (Maharashtra Act No. IX of 2021), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,
